माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ४९/२०२१**

**अपिलार्थी, श्री. देवानंद मधुकरराव कामडी,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक,**
उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा, ता. जि. वर्धा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक(प्रादे व कॅम्पा),**
उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा, ता. जि. वर्धा

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०१.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०८.२०२० | ०३.०९.२०२० | १८.०९.२०२० | १२.१०.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी **तथा** कार्यालयीन अधिक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा ता. जि.वर्धा यांच्याकडे दिनांक ०३.०८.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दि.१ एप्रिल २०१४ ते दि.३१.०५.२०१९ पर्यंतच्या अपिल अर्जावर घेतलेले निर्णय अमान्य असल्यामुळे अशा काही अपीलकारांनी, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले असल्यास, अशा प्रकरणाबाबतच्या आयोगाच्या आदेशाच्या साक्षांकित प्रती " याबाबत माहिती मागितलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०८.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असा प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक १८.०९.२०२० रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

अधिकारी **तथा** सहाय्यक वनसंरक्षक(प्रादे व कॅम्पा), उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा ता. जि.वर्धा यांचेकडे "माहिती मिळाली नाही," असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.१०.२०२० रोजी सुनावणी घेवून जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ७ दिवसांचे आत अपिलार्थी यांना पुरवावी असे आदेशित केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक ०१.०१.२०२१ रोजी "माहिती निर्धारित वेळेत न मिळता विलंबाने प्राप्त झाली," असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर दिनांक १९.१०.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती, सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा ता. जि.वर्धा हे अनुपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक(प्रादे व कॅम्पा), उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा ता. जि.वर्धा उपस्थित होते. आयोगासमक्ष झालेल्या चर्चेअंती पुढील तारखेस सुनावणी आयोजित करण्याबाबत सुचित करण्यात आले.

सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०३.०१.२०२३ रोजी पुनश्च: सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा ता. जि.वर्धा श्री. एस. एम. गोरे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक(प्रादे व कॅम्पा), उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा ता. जि.वर्धा श्री. जि. पी. बोबडे उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी श्री. कामडी यांनी दाखल माहिती अर्जात दि. ०१.०४.२०१४ ते दि. ३१.०५.२०१९ पर्यंतच्या अपिल अर्जावर घेतलेले निर्णय अमान्य असल्यामुळे अशा काही अपिलाकारांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असल्यास, अशा माहिती प्रकरणबाबतच्या आयोगाच्या आदेशाच्या सांक्षाकित प्रती देण्यात यावा याबाबत माहिती मागितली आहे. त्यावर तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, उपवनसंरक्षक, वर्धा यांनी दि. ०३.०९.२०२० रोजी माहिती अर्जावर मागितलेली माहिती सोबत देण्यात येत आहे असे, नमूद केले. अपिलार्थी यांना कुठलिच माहिती प्राप्त झाली नाही असा आक्षेप नोंदवित प्रथम अपिल अर्ज दाखल केला. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१०.२०२० रोजी सुनावणी घेवून, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती ७ दिवसांचे आत त्यांना प्रदान करण्याबाबत आदेशित करण्यात आले. मात्र मागितली माहिती २१ दिवस विलंबाने प्राप्त झाली

असल्याचे नमूद करित जबाबदार अधिकारी कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी असा आक्षेप नोंदवून दि. ६.०१.२०२१ रोजी व्दितीय अपिल दाखल केला. अपिलार्थी यांनी आक्षेप करित असतांना २१ दिवसाचा विलंबाबाबत आक्षेप नोंदवित असता, संपूर्ण विश्वात कोरोना महामारी असल्यामुळे शासकीय कर्मचारी अधिकारी यांच्यावर कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत निर्बंध होते. तसेच त्याकाळातील वैद्यकीय हानी लक्षात घेता, सदर विलंब क्षमापित करण्यात येते. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, उपवनसंरक्षक, वर्धा यांनी त्यांच्या स्तरावरुन अपिलार्थी यांना जोडपत्र-अ प्रमाणे मागितलेली माहिती तात्काळ प्रदान करावी व त्यांची पोहच आयोगास सादर करावी, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :०३.०१.२०२३**

जावक क्रमांक --1114------ दिनांक 20 FEB 2023 ---

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर